लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई यास सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरीता भागभांडवली अंशदान मंजूर करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक- एलएएस-२०१४/प्र.क्र.१८५/महामंडळे
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २६ मार्च,२०१५

वाचा :- १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक- एलएएस-२०१४/प्र.क्र.१३२/महामंडळे, दि.३ जून, २०१४
२) वित्त विभाग,शासन परिपत्रक,क्र.अंदाज-२०१४/प्र.क्र.११०/अर्थ-३, दि.१ जुलै,२०१४.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक- एलएएस-२०१४/प्र.क्र.१८५/महामंडळे, दि.२२/०७/२०१४.
४) वित्त विभाग,शासन परिपत्रक,क्र.अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.२ जानेवारी, २०१५.
५) वित्त विभाग,शासन परिपत्रक,क्र.अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.९ फेब्रुवारी, २०१५.

**शासन निर्णय** :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई या शासन अंगीकृत उपक्रमाची स्थापना दि.११ जुलै,१९८५ रोजी कंपनी अधिनियम-१९५६ अन्वये करण्यात आलेली आहे. या महामंडळामार्फत अनुसूचित जातीतील मातंग समाजाच्या व्यक्तीच्या आर्थिक उन्नती करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येतात.

२. या महामंडळास सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता भागभांडवली अंशदानासाठी रु.७५०००० हजार (अक्षरी रुपये- पंच्याहत्तर कोटी फक्त) एवढी अर्थसंकल्पिय तरतूद करण्यात आली आहे. सदर अर्थसंकल्पित तरतूदीपैकी यापूर्वी संदर्भिय क्र.१ व ३ अन्वये एकूण तरतूद रु.४५०००० हजार भागभांडवली अंशदान वितरीत करण्यात आले आहे.

३. आता संदर्भाधीन क्र. ४ व ५ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार मूळ तरतूद रु.७५०००० हजार इतक्या रक्कमेच्या ७५ % तरतूद म्हणजेच रु.५६२५०० हजार या रक्कमेमधून संदर्भिय क्र.१ व ३ येथील शासन निर्णयान्वये भागभांडवली अंशदानासाठी वितरीत करण्यात आलेली एकूण तरतूद रु.४५०००० हजार वजा जाता उर्वरीत भागभांडवली अंशदान **रु.११२५०० हजार (अक्षरी रुपये- अकरा कोटी पंचवीस लाख फक्त)** एवढी तरतूद वितरीत करण्यास शासन खालील अटी व शर्तीवर मान्यता देत आहे :-

i) महामंडळाने लाभार्थ्यांना अर्थसहाय्य मंजूर करण्याचे धोरण अशा प्रकारे निश्चित करावे जेणेकरुन भविष्यात लाभार्थ्यांकडून वसुलीच्या थकबाकीत वाढ होणार नाही.

ii) महामंडळाचे वार्षिक लेखे विधीमंडळास सादर करणे ही संविधानिक जबाबदारी आहे. त्यासाठी अपूरा कर्मचारी वर्ग हे कारण न देता महामंडळाचे वार्षिक लेखे विधीमंडळास आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रलंबित लेखे पुढील ३ महिन्यात पूर्ण करण्याची कार्यवाही प्राधान्याने करावी.

iii) महामंडळाने वसूलीबाबत विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. कारण या वसूलीमधूनच नवीन लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करुन घेता येईल. तसेच राष्ट्रीय उपक्रमांचे कर्ज देखील फेडता येईल. तरी महामंडळाच्या वसूलीचे अत्यल्प असलेले प्रमाण वाढविण्यासाठी ठोस उपाययोजना करुन त्याप्रमाणे प्रयत्न करावेत.

iv) थकबाकीच्या रकमा कालबध्द पध्दतीने वसुल करण्याबाबतची उपाययोजना / धोरण सुचविण्यात यावे.

v) महामंडळ राबवित असलेल्या योजनांची माहिती (यावर्षी निश्चित केलेली उद्दीष्टे व साध्य झालेले लक्ष) शासनाकडे सादर करावी.

vi) योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.

vii) कर्ज वसुलीमध्ये समाधानकारक प्रगती नसल्यास पुढील वर्षी भागभांडवल अशंदान वितरीत करण्यात येणार नाही याची महामंडळाने नोंद घ्यावी.

viii) महामंडळाने ऑन लाईन (on line) संगणक प्रणालीविकसीत करुन त्याची अंमलबजावणी करावी.

ix) वरील भागभांडवलातून जिल्हानिहाय निवासी उप जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत लॉटरी पध्दतीने कर्जाचे वाटप करावे.

x) सन २०१२-२०१३ व सन २०१३-२०१४ या वर्षात कर्ज वाटप केलेल्या /करण्यात येणाऱ्या लाभार्थ्यांची नावे व जेष्ठता यादी त्यांच्या दिनांकासह व अर्जाच्या दिनांकासह महामंडळाच्या नोटीस बोर्ड व वेबसाईटवर तसेच, शासनाच्या नोटीस बोर्डवर टाकावी.

xi) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक,दि.२२/०७/२०१४ नुसार सूचनेची अंमलबजावणी करावी.

xii) **सदर निधी हा राज्य शासनाच्याच योजना राबविण्यासाठी खर्चित करावा, राष्ट्रीय महामंडळाच्या योजना राबविण्यासाठी खर्चित केल्यास संबंधितावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.**

३. वरील भागभांडवली अंशदानाबाबत सह सचिव/उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाहीकरिता प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण मुंबई विभाग, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

४. या बाबींवर होणारा खर्च पुढीलप्रमाणे नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो चालू आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा:-

४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील
भांडवली खर्च,
०१ अनुसूचित जातीचे कल्याण
१९० - सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका,
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-
राज्य योजनांतर्गत योजना-
(०१) भाग भांडवली अंशदान
(०१) (०१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास
(वि.घ.यो.) (४२२५ ००२२)
५४ गुंतवणूका
मागणी क्रमांक एन-४

५. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र अंदाज २०१४/प्र.क्र.८५/ अर्थ-३, दि.२ जानेवारी,२०१५ व दि.९ फेब्रुवारी,२०१५ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(संजय गुळेकर)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सह सचिव / उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ,मंत्रालय, मुंबई
प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)

व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई,/ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, पाचवा मजला, मुंबई
कार्यासन- अर्थसंकल्प/ विघयो सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
निवड नस्ती का-महामंडळे.